| MHLA110011812022 | <u>नि.दि.दावा क्र.१२८२/२०२२ (धोंडीराम वि. नरसिंग व इतर) मध्ये नि.क्र.२४ वरील आदेश</u> |
|---|---|

१. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले तसेच वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला व सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादीने दावा मिळकतीची मोजणी करणेकामी कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने सदरचा दावा विवाद जमिनीची मोजणी करुन हद्दी खुणा कायम करुन अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेकरीता व कायमचा मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ८ व १० यांनी विवाद जमिनीवर अतिक्रमण केल्याचे वादीचे कथन आहे. सबब, विवाद जमिनीची मोजणी, उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, शिरुर अनंतपाळ यांच्यामार्फत करणे उचीत राहील. तसेच अर्जात मागणी केल्याप्रमाणे वाद मिळकतीची मोजणी झाल्यास पक्षकारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, वादाचा निपटारा होणार आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. नि.क्र.२४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी मौजे घुग्गी (सां.), ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथील जमीन सर्वे नं.२९ ची मोजणी करुन वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीचे क्षेत्र स्वतंत्र दर्शवून विवाद जमिनीच्या हद्दी खुणा कायम करुन मोजणी नकाशासह अहवाल, मोजणी फी भरल्यानंतर दोन महिन्याच्या आत सादर करावा.

४. मोजणीच्या वेळी मिळकतीमध्ये अतिक्रमण आढळून आल्यास सदर अतिक्रमीत क्षेत्र नकाशामध्ये स्पष्टपणे दर्शवून कोर्ट कमिशनर यांनी अहवाल दाखल करावा.

५. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांना दावा मिळकतीची मोजणी करतेवेळी लगत सर्वे नंबरची मोजणी करणे आवश्यक असल्यास त्यांना तशी परवानगी देण्यात येत आहे.

६. कोर्ट कमिशनर यांनी पक्षकारांना आगाऊ नोटीस काढून मोजणीबाबतची कार्यवाही करावी.

७. संबंधीत पक्षकारांनी नियमाप्रमाणे संबंधित विभागाकडे मोजणी फी एक महिन्याचे आत भरुन पावतीची प्रत न्यायालयात दाखल करावे.

८. वर नमूद बाबीची पुर्तता झाल्यानंतर कोर्ट कमिशनरला पत्र द्यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2024.12.04 16:35:26 +0530

निलंगा.
दि.०४/१२/२०२४

(**श्रीमती व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.